## प रि शि ष्ट - २

सामान्य अध्यापन गुणांक श्रेणी व तिचे
स्पष्टीकरण.

## सामान्य अध्यापन क्षमता गुणांक श्रेणी

| अ. नं. | घटक | १ | २ | ३ | ४ | ५ |
|---|---|---|---|---|---|---|
| ०१] | पाठ टाचण लेखन | | | | | |
| ०२] | संघटन | | | | | |
| ०३] | प्रारंभाची कार्यवाही | | | | | |
| ०४] | हेतु कथन | | | | | |
| ०५] | स्पष्टीकरण, उदाहरणे दाखले | | | | | |
| ०६] | प्रश्न पध्दती | | | | | |
| ०७] | प्रबलन | | | | | |
| ०८] | फलक लेखन | | | | | |
| ०९] | चेतक बदल | | | | | |
| १०] | वर्ग व्यवस्थापन | | | | | |
| ११] | वैविध्यपूर्ण अध्ययन अनुभवांचा वापर | | | | | |
| १२] | समारोप कार्यवाही व स्वाध्याय | | | | | |
| १३] | मूल्यमापन साधनांचा उपयोग | | | | | |
| १४] | मूल्यमापनातील विद्यार्थी प्रतिसाद | | | | | |
| १५] | शिक्षक व्यक्तिमत्व | | | | | |
| १६] | विषय ज्ञान प्रभुत्व | | | | | |
| १७] | नियोजनबध्द कार्यवाही | | | | | |
| १८] | वर्ग वातावरण | | | | | |

नीरीक्षकाची सही -

अध्यापन पध्दती प्रमुख -

दिनांक -

५ x ---------------

४ x ---------------

३ x ---------------

२ x ---------------

१ x ---------------

सर्वसामाध्य अभिप्राय [१०] पैकी

## पाठ निरीक्षण निकष

[१] पाठ टाचण लेखन :-

[१] सर्व प्राथमिक माहिती :- ही माहिती म्हणजे प्रशिक्षणार्थ्यानि स्वतः चे नांव, हजेरी क्रमांक शाळेचे नांव, इयत्ता व तुकडी, विषय, घटक, उपघटक अध्यापन पध्दती, पाठ क्रमांक, एकूण पाठ क्रमांक, दिनांक, तासिकेची वेळ, अध्यापन पध्दती, मार्गदर्शकाचे नांव व सही इत्यादी बाबी पाठ टाचणात व्यवस्थित लिहिलेल्या आहेत.

अपेक्षित, पूर्वज्ञान, प्रारंभ हे तुकड्यन व्यवस्थित लिहिले आहे. दुस-या पानावर सहा उभे स्तंभ आहेत.

[१] शैक्षणिक अनुभूती – शिक्षक कृती, विद्यार्थी कृती, समारोप.

[२] पाठ वस्तु, उद्दिष्टे व स्पष्टीकरणे, आधार प्रणाली.

[३] मूल्यमापने साधने – संकलन, उपयोजन.

[४] फलक लेखन – आटोपशीर प्रमुख मुद्दे, प्राथमिक माहिती, हे पाठ टाचण स्वयंमूल्यमापन श्रेणी वापरुन त्यानुसार सर्वसाधारण ८० %. मार्कस पडले तर योग्य आहे असे समजावे.

[२] संघटन :-

सर्व मुद्यातील सामान्य बोधांची योग्य गुंफण व तुलना करणा-या मनोव्यापारास तार्किक मानसिक संघटन म्हणतात. हे कितपत योग्य जमले ते पहावे.

[३] प्रारंभाची कार्यवाही :-

प्रारंभात पूर्वज्ञानाशी संबंध प्रस्थापित केलेला असावा, प्रस्तावना घटकाला अनुरुप शिकवण्यासाठी मानसिक भावनिक तयारी करणारी असावी. तसेच त्यातून प्रेरणा किंवा जिज्ञासा जागृत झालेली असावी. सौम्य चिंता प्रवर्तन हे सुध्दा शिकण्यासाठी भावनिक तयारी करु शकते.

यापृमाणे प्रारंभाचा अपेक्षित परीणाम कितपत साध्य झाला ते पहावे.

[४] हेतुकथन :-

हेतुकथनाची प्रस्तावनेशी सांगड घातलेली असावी. पाठात नेमके काय व का शिकावयाचे याची सुस्पष्ट कल्पना देणारे विधान असावे. त्यात हेतुची मांडणी सुस्पष्ट व निश्चित केली का नाही ते पहावे.

[५] उदाहरणे दाखले, स्पष्टीकरण :-

उदाहरणे, दाखले, अर्थपूर्ण, सोपे अनुरूप, मनोवेधक होते का ते पहावे. यावरून स्पष्टीकरण कितपत प्रभावी होते ते पहावे.

[६] प्रश्न पध्दती :-

प्रश्न, संमिश्र, सूचक, अंदाजाला वाव मिळेल असे असून नयेत. निरर्थक प्रश्न, नंदी बैली प्रश्न नसावेत. प्रश्न सहजतेने विचारलेले असावेत. वयोगट विचारात घेऊन प्रश्न विचारलेले असावेत. एकावेळी एकाच कल्पनेवर आधारीत प्रश्न असावा. त्यात अनावश्यक शब्द असू नयेत. प्रश्नामध्ये विचार स्पष्ट, रचना मोजक्या शब्दात व भाषा निसंदिग्ध होती का ते पहावे. विविध प्रश्नांच्या रचनेत वैविध्य कितपत होते ते पहावे.

[७] प्रबलन :-

विद्यार्थ्यांनी उत्तरे दिल्यानंतर त्याना प्रेरणा मिळावी यासाठी योग्य प्रमाणात प्रबलन वापरलेले असावे. छान,बरोबर, ठीक, उत्तम, चांगला, शाब्बास, अशा शब्दांचा योग्य वापर करून प्रबलन दिलेले असावे. प्रबलनाचा अतिरेक मात्र नसावा.

[८] फलक लेखन :-

फलक लेखनातील योग्य प्राथमिक माहिती लिहिलेली असावी. प्रमुख मुद्दे, योग्य आकृती, व्याख्या आवश्यक बाबींची माहिती फलक लेखनात यावी. फलक लेखन आटोपशीर व अक्षर सुवाच्य, स्पष्ट व चांगले असावे.

[९] चेतक बदल :-

शिकविताना, योग्य हावभाव, विविध व योग्य शैक्षणिक वस्तुंचा वापर, केलेला असावा. आकृती चित्रे, नकाशा, दृकश्राव्य साधने या व्दारे मुलांच्या समोर विविध चेतके ठेवून त्यांचे लक्ष पाठाकडे खिळवून ठेवण्यात कितपत यश आले ते पहावे. चेतक बदलात विद्यार्थ्यांचा योग्य सहभागही असतो. तो कितपत साध्य झाला. तसेच बोलण्यातील बदल, संवेदन लक्ष्यातील बदल, मुलांचा शाब्दिक व शारीरीक सहभाग या बाबींचाही समावेश महत्वाचा आहे.

[१०] वर्ग व्यवस्थापन :-

वर्गातील मुलांची योग्य बैठक व्यवस्था केलेली असावी. खिडक्या उघडलेल्या असाव्यात, शिकण्यास योग्य वातावरण निर्माण केलेले असावे. पुरेसा उजेड असून मुलांच्यावर योग्य नियंत्रण ठेवलेले असावे.

[११] वैविध्यपूर्ण अध्ययन अनुभवांचा वापर :-

घटकाशी संबंधित दिलेले विविध अनुभव देत असताना जास्तीजास्त विविधता आणलेली असावी.

[१२] समारोप कार्यवाही व स्वाध्याय :-

समारोप आकर्षक व पुढील अध्ययनास प्रेरणा निर्माण करणारा असावा. प्रमुख मुद्यांची उजळणी, प्राप्तज्ञान पूर्वज्ञान यांचा संबंध जोडून,

उद्दिष्ट प्रारंभाशी सांगड घालून, प्राप्त ज्ञानाचा नवीन, परिस्थितीत उपयोग करुन, पुढील अध्ययनाशी संबंध जोडून समारोप करता येतो. यातून विषय ज्ञानात आत्मविश्वास आवड निर्माण झाली. विषयातील शिकलेल्या ज्ञानाची स्मृती किंवा धारणा कितपत टिकली. हे पहाणे. शेवटी योग्य स्वाध्याय दिला किंवा नाही ते पहावे.

[१३] मूल्यमापन साधनांचा उपयोग :-

मूल्यमापन साधने वर्ग व घटकानुसार योग्य होती. विद्यार्थ्यांची शारीरीक व बौध्दिक क्षमतांचा विचार करुन घटकास उपयुक्त अध्ययन परीणाम घडवून आणणारी होती. या साधनाव्दारे अध्ययन निष्पत्ती किती झाली ती घटकास अध्ययन अनुभवास उद्दिष्टाशी निगडीत कितपत होती हे पहावे.

[१४] मूल्यमापनातील विद्यार्थी प्रतिसाद :-

सर्व विद्यार्थी सर्व कारणे, सर्व घटना सर्व परिणाम सांगतील तेव्हां पूर्ण यशस्वीता दाखवितात. कोणतेच कारण कोणतीच घटना, परीणाम सांगता आली नाही तर पूर्ण अयशस्वीता दाखवितात. मात्र यादोन्ही बिंदू मधील एखादी अवस्था वर्गात निर्माण होते. त्या अवस्थेची कितपत अचूक माहिती मूल्यमापन साधने देऊ शकतात, तेवढी विद्यार्थी प्रतिसाद मिळाला असे म्हणता येते.

[१५] शिक्षक व्यक्तिमत्व :-

शिक्षकांचा योग्य पोषाख, भरपूर आत्मविश्वास, योग्य हावभाव व कृती, विद्यार्थ्यांचे अवधान खेचून घेण्याची पात्रता किती प्रमाणात होती त्याचे योग्य निरीक्षण व्हावे.

[१६] विषय ज्ञान प्रभुत्व :-

पूर्वज्ञान व नवीन पाठयांश यात सलगता निर्माण करुन विविध अनुभव द्यावे लागतात. मुद्यांची मांडणी क्रमबध्द व निश्चित हवी. कोणत्याही मुद्याचे एखाद्या शंकेचे योग्य व चांगले स्पष्टीकरण देता येण्यासाठी आत्मविश्वास पूर्ण शिकविता आले पाहिजे. यासाठी त्या विषयाचे सखोल ज्ञान असेल तरच हे शक्य होईल. ते कितपत शक्य झाले यावर विषयज्ञान प्रभुत्व अजमावता येईल.

[१७] नियोजनबध्द कार्यवाही :-

पाठ टाचण लेखानुप्रमाणे शिक्षकाने प्रारंभ हेतुकथन व्यवस्थित करुन शिक्षककृती मधील सर्व मुद्दे उपमुद्दे स्पष्ट केले प्रश्न विचारले. योग्य तेथे दिग्दर्शन कथन करुन साहित्याचा वापर केला. यासर्व कृती उद्दिष्टे व स्पष्टीकरणाशी क्रमाने निगडीत असाव्यात. तसेच पाठ टाचणात दर्शविल्याप्रमाणे योग्य क्रमाने फलक लेखन झाले असावे. हा सर्व भाग नियोजना प्रमाणे पूर्ण करता आला तर नियोजन बध्द कार्यवाही म्हणता येईल.

[१८] वर्ग वातावरण :-

वर्गातील मुलांची बैठक व्यवस्था नीट करुन मुले शिकण्यास उत्सुक होतील असे वातावरण निर्माण केलेले असावे. भरपूर प्रकाश, सर्व सुविधा उपलब्ध शिक्षक व विद्यार्थी उत्साही असतील तर योग्य वर्गवातावरण आहे असे म्हणता येईल.

0–0–0–0–0